पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ८

सभावृत्तांत

दिनांक:- ९/१०/२०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ९/१०/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.सायकर अजय शंकरराव
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.पवार संगीता शाम
११. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१२. मा.चिखले(मराठे) अश्विनी अजित
१३. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
१५. मा.भालेकर पंकज दत्तात्रय
१६. मा.पवार जितेंद्र हनुमंत
१७. मा.भालेकर प्रविण महादेव

याशिवाय श्री. दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी तथा सभासचिव, श्री. सतिश इंगळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.लियाकत पिरजादे कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. पांडुरंग जाधव (लेखाधिकारी), श्री. तानाजी दाते (सहा.आरोग्य अधिकारी), श्री.हनुमंत शिंदे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.शहाजी गायकवाड उपअभियंता (स्थापत्य), श्री. अ.ना. आडसूळे प्रभारी उपअभियंता (विद्युत), श्री.एस. के. शितोळे, क.अभियंता (झोनिपु), सुनिल जाधव क. अभियंता (नगररचना) श्रीमती. प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक), श्री. बी.एस.नायकवडी (लेखापाल),श्री. सुभाष पवार (क्रीडा पर्यवेक्षक), इ. अधिकारी सभेस हजर होते.

सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले.दि. २१/८/२०१५ व दि. ११/९/२०१५ (कार्यपत्रिका क्र.६ व कार्यपत्रिका क्र.७) चा सभावृत्तांत कायम करणेत आला.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक:- मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका) अनुमोदक:- मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू

सन्मा.नगरसदस्या सौ. अरुणाताई भालेकर यांचे पुत्र कै.विशाल दिलीप भालेकर, कै.निवृत्ती झुंबर भालेकर, कै. बंडू वामन शिरसाठ, माजी नगरसेवक श्री. माऊली जाधव यांच्या मातोश्री कै पारुबाई जाधव, ज्येष्ठ पत्रकार श्री.नंदकुमार सातुर्डेकर यांच्या पत्नी कै.वर्षा नंदकुमार सातुर्डेकर अशा मान्यवरांचे दु:खद निधन झालेले असल्याने आजच्या मासिक सभेत त्यांना श्रध्दाजंली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वांनुमते मान्य झाली.

मा.सभापती:- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१.** प्रभाग क्र.१३ यमुनानगर येथील विविध चौकास नामकरण करणेबाबत

१) भक्ती शक्ती चौकास "**भक्ती शक्ती चौक**" असे नामकरण करण्यात यावे

२) भक्ती शक्ती चौक ते त्रिवेणीनगर चौकात एकेरी वाहतूक चालू करण्यात यावी. व या

संदर्भात वाहतूकीस अडथळा निर्माण होवु नये या संदर्भात मार्ग फलक लावण्यात यावेत.
३) लोकशाहिर आण्णाभाऊ साठे क्रीडांगण, साईनाथ – यमुनानगर प्रभाग क्र.१३ या ठिकाणी उभारण्यात आलेली प्रेक्षक गॅलरी यांस "**स्व. बाळासाहेब ठाकरे**" असे नांव देणेबाबत.
मा.अश्विनी (चिखले) मराठे यांचा प्रस्ताव

**विषय क्र.२** चौका चौकामध्ये नामकरणाच्या पाटया लावणेबाबत
१) लष्करे चौक राज नगर
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चिल्र्डन पार्क संजय नगर
३) सोमेश्वर मंदिर चौक मिलींद नगर जेतवन बौध्दविहार चिल्र्डन पार्क मिलींद नगर, व्यंकटेश बालाजी मंदिर संस्कृत भवन राजनगर
४) किसन अनिल पवार चौक बौध्द नगर नांव देणेबाबत.
मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव

**विषय क्र.३** श्री.दाते तानाजी होनाजी सहा.आरोग्याधिकारी, यांचे कामकाजाचे पध्दतीचा निषेध करुन त्यांची फ प्रभागामधून इतरत्र बदली करणेत यावी. सदरचा ठराव कायम होण्याची वाट न पाहता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडे सादर करणेत यावा.
मा.बो-हाडे शुभांगी संजय,मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे,मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु.,मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ,मा.भालेकर अरुणा दिलीप,मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका),मा.सायकर अजय शंकरराव,मा.जाधव साधना रामदास,मा.जाधव राहुल गुलाब, मा.पवार संगीता शाम,मा.तानाजी विठ्ठल खाडे,मा.चिखले(मराठे) अश्विनी अजित,मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन,मा.मासुळकर समीर मोरेश्वर यांचा प्रस्ताव

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-**

ठराव क्र. १८ विषय क्र.१
दि. ९/१०/२०१५ विभाग
सुचक:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित अनुमोदक:- मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
संदर्भ:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित यांचा दि. ९/१०/२०१५ चा प्रस्ताव
विषय:-प्रभाग क्र.१३ यमुनानगर येथील विविध चौकास नामकरण करणेबाबत
१) भक्ती शक्ती चौकास "**भक्ती शक्ती चौक**" असे नामकरण करण्यात यावे
२) भक्ती शक्ती चौक ते त्रिवेणी नगर चौकात एकेरी वाहतूक चालू करण्यात यावी. व या संदर्भात वाहतूकीस अडथळा निर्माण होवु नये या संदर्भात मार्ग फलक लावण्यात यावेत.
३) आण्णाभाऊ साठे क्रीडांगण, साईनाथ – यमुनानगर प्रभाग क्र.१३ या ठिकाणी उभारण्यात आलेली प्रेक्षक गॅलरी यांस "**स्व. बाळासाहेब ठाकरे**" असे नांव देणेबाबत.
विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
**सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.**

-----

ठराव क्र. १९ विषय क्र.२
दि. ९/१०/२०१५ विभाग
सुचक:- मा.संगीता शाम पवार अनुमोदक:- मा.जाधव राहुल गुलाब
संदर्भ:- मा. संगीता शाम पवार यांचा दि. ९/१०/२०१५ चा प्रस्ताव
विषय:-चौका चौकामध्ये नामकरणाच्या पाटया लावणेबाबत
१) लष्करे चौक राज नगर
२) बाबासाहेब आंबेडकर चिल्र्डन पार्क संजय नगर
३) सोमेश्वर मंदिर चौक मिलींद नगर जेतवन बौध्दविहार चिल्र्डन पार्क मिलींद नगर, व्यंकटेश बालाजी मंदिर संस्कृत भवन राजनगर
४) किसन अनिल पवार चौक बौध्द नगर नांव देणेबाबत.
विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
**सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.**

-----

ठराव क्र. २० विषय क्र.३
दि. ९/१०/२०१५ विभाग
सुचक:- मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका) अनुमोदक:- मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापु
संदर्भ:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे यांचा दि. ८/१०/२०१५ चा प्रस्ताव

श्री.दाते तानाजी होनाजी सहा.आरोग्याधिकारी, यांचे कामकाजाचे पध्दतीचा निषेध करुन त्यांची फ प्रभागामधून इतरत्र बदली करणेत यावी. सदरचा ठराव कायम होण्याची वाट न पाहता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडे सादर करणेत यावा.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून मा.आयुक्त साहेब प्रभाग समिती सभेस उपस्थित राहणेबाबत तारीख मिळणेपर्यंत सभा तहकुब राहील असे निर्देश दिले व सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(बो-हाडे शुभांगी संजय)
अध्यक्षा
फ प्रभाग समिती
निगडी ४४

क्रमांक – फक्षेका/सभा/कावि/२०१/२०१५
दिनांक- २०/१०/२०१५

सही/-
(प्रशासन अधिकारी)
सचिव सभा शाखा
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रति,
मा. ............................................

नगरसदस्य/नगरसदस्या